# पुराभिलेख संचालनालय
महाराष्ट्र शासन
(पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग)
दूरध्वनी - कार्यालय २२८४ ३९७१, २२८४ ४२६८, १५६, सर कावसजी जहांगीर रेडिमनी इमारत, महात्मा गांधी मार्ग, काळा घोडा, फोर्ट,मंबई ४०० ०३२
Email : mumbaiarchives@gmail.com


जा.क्र.पुरा.संचा/आस्था/VD-२०४७/बी- ३८५७ दिनांक : 16 MAY 2025

**वाचा : विकसित महाराष्ट्र २०४७ अंतर्गत १५० दिवस उपक्रम विकसित महाराष्ट्र Vision Document तयार करण्याबाबत मार्गदर्शक सुचना.**

**:: परिपत्रक ::**

**विषय : विकसित महाराष्ट्र २०४७ अंतर्गत विकसित महाराष्ट्र Vision Document तयार करण्यासाठी नागरिकांकडून सुचना मागविणेवावत.**

विकसित महाराष्ट्र २०४७ या उपक्रमाअंतर्गत Vision Document तयार करण्याबाबत राज्य शासनाचे निर्देश आहेत. त्यात खालीलप्रमाणे तीन भाग आहेत.

१. Long-term Vision of १५ August २०४७ (Bharat @ १००)

२. Medium-term Vision of ९ May २०३५ (Maharashtra@७५)

३. Short-term Vision of २ October २०२९ (With Annual targets)

वरील प्रमाणे Vision Document तयार करण्यासाठी शासनाच्या निर्देशानुसार या कार्यालयात समिती स्थापन करण्यात आलेली आहे. माहे मे २०२५ पासून ते ०२ ऑक्टोबर २०२५ पर्यंत या १५० दिवसांत पुराभिलेख संचालनालय, मुंबई या कार्यालयास **विकसित महाराष्ट्र २०४७ Vision Document** अनुषंगाने कार्यवाही करावयाची आहे.

उपरोक्त प्रमाणे विकसित महाराष्ट्र २०४७ Vision Document तयार करण्यासाठी पुराभिलेख संचालनालयाच्या कार्य क्षेत्राशी (अपेक्षित बदल, टप्पे, कार्यसुलभता, AI /तसेच इतर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी) संबंधित भविष्यात होणारे बदल विचारात घेऊन त्या अनुषंगाने आवश्यक त्या अपेक्षित सुधारणाच्या अंमलबजावणीसाठी संचालनालयाशी संबंधित नागरिकांकडून नाविन्यपूर्ण सूचना या परिपत्रकाद्वारे मागविण्यात येत आहेत.

सदर सुचनांवर समितीतील तज्ञांची चर्चा होऊन अंतिम आहवाल तयार करून तो शासनास सादर करण्यात येणार आहे.

पुराभिलेख संचालनालय/संचालनालयाशी संबंधित अभिप्राय/सूचना नागरिकांनी या कार्यालयाच्या archives.suggestions@gmail.com या ईमेलवर तसेच https://maharashtra-archives.org या संकेतस्थळावर (अभिप्राय या शिर्षकाखाली) दि. १५ जून, २०२५ पर्यंत पाठविण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे.

संचालक,
पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई